# यावल महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवडा साजरा

यावल (प्रतिनिधी )येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज मर्यादित जळगाव संचालित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .सदर कार्यक्रमात प्रमुख  वक्ता म्हणून डाॅ. योगेश महाले,मुलजी जेठा महाविद्यालय, जळगाव, उपस्थित होते तर अध्यक्षस्थान उपप्राचार्य प्रा. अर्जुन पाटील यांनी भूषविले.

मराठी भाषेचा प्रसार- प्रचार व संवर्धन व्हावे तसेच भाषेविषयीच्या जाणिवा प्रगल्भ होणे या उद्देशाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन मराठी विभागामार्फत करण्यात आलेले आहे. डॉ. योगेश महाले यांनी "मराठी भाषा:  काल, आज आणि उद्या "या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की मराठी भाषेवर निष्ठा असलेल्या  सर्व संतांनी मराठीला समृद्ध करण्याचे व वेगळया उंचीवर नेण्याचे कार्य केले . मराठी भाषा जेवढी  ज्ञान व्यवहारात वापरली जाईल  तेवढी ती अधिक समृद्ध होईल .तसेच तिच्या संवर्धनासाठी मूलभूत पातळीवर  प्रत्येकाने कार्य करणे गरजेचे आहे.प्रा.अर्जुन पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रातिपादन केले की वर्तमान काळात मराठीअधिक प्रमाणात बोलली जाणे व शिक्षण क्षेत्रात तिचा वापर वाढविणे गरजेचे आहे.  महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.सुधा खराटे यांनी केले तर आभार श्री सुभाष कामडी यांनी मानले .कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा.एम.

डी.खैरनार, प्रा. संजय पाटील ,डॉ.सुधीर कापडे, डॉ. प्रल्हाद पावरा ,प्रा. एस. आर. गायकवाड यांनी सहकार्य केले . सदर कार्यक्रमास सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



## यावल येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**यावल** ▪ येथील महाविद्यालयात मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे आयोजन करण्यात आले होते. यात व्याख्यान, कवी संमेलन व कविता वाचन, कथाकथन, काव्य स्पर्धा व लेखकाचे अनुभव कथन या कार्यक्रमांचे आभासी मंचद्वारे आयोजन करण्यात आले होते. मराठी विभागातर्फे १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते.

मराठी भाषा : काल, आज आणि उद्या या विषयावर प्रा.डॉ. योगेश महाले यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्‌यार्थ्यांचे कवी संमेलन व कविता वाचन झाले. काव्य स्पर्धा घेण्यात आली. त्यात अनुक्रमे चारुलता पाटील एफवायबीएससी प्रथम, शाहरुख तडवी एफवायबीए द्वितीय, व समाधान थिवर टीवायबीए तृतीय यांनी यश मिळवले. कथाकथनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यात डॉ. सुधा खराटे यांनी स्वलिखित आधाराचा हात व बोबड्या मुली या कथा प्रभावी शैलीने सादर केल्या. तसेच महेश अहिरे याने चादर कथेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. एम. डी.खैरनार यांनी खान्देशातील समृद्ध साहित्य व साहित्यिकांचा आढावा घेतला. आभार कोमल बोरनारे हिने मानले. प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य प्रा.ए. पी. पाटील, प्रा.संजय पाटील, डॉ. हेमंत भंगाळे यांनी सहकार्य केले.

कविसंमेलन, कथाकथनाचे आयोजन लेखनासाठी साधना हवी २७ रोजी माझा लेखन प्रवास या विषयावर शिरपूर येथील एच. आर. पटेल महिला महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा नवलेखक डॉ. युवराज पवार यांनी लेखन प्रवासातील विविध अनुभव व्यक्त केले. लेखनासाठी साधना आवश्यक असते. तसेच आत्मचिंतन, अनुभव, आत्मभान, चिंतन, वाचन व सूक्ष्म निरीक्षणशक्ती या गोष्टींची उत्तम लेखनासाठी गरज असते, असे त्यांनी सांगितले.

Mon, 31 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65938970



, २३ जानेवारी २०२२

## यावल कॉलेजमध्ये रंगले ऑनलाइन कवी संमेलन

**प्रतिनिधी** | यावल

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ऑनलाइन कवी संमेलन व कविता वाचनाचा कार्यक्रम घेतला.

प्रमुख पाहुणे म्हणून चोपडा येथील कवी डॉ.मधुचंद्र भुसारे, तर अध्यक्षस्थानी डॉ. हेमंत भंगाळे होते. डॉ.भुसारे, डॉ.सुधा खराटे, सुभाष कामडी, चारू लता पाटील यांनी कविता सादर केल्या. कोमल बोरणारे, महेश अहिरे व जयश्री पाटील यांनी नामवंत कवींच्या कविता सादर केल्या. डॉ.हेमंत भंगाळे यांनी संवाद साधताना, काव्य निर्मितीसाठी संवेदनशीलता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, चिंतन व मनन या गोष्टींची गरज असते, असे सांगितले. यानंतर 'वेळ' नावाची वास्तवदर्शी व प्रबोधन करणारी कविता सादर केली. प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन डॉ.एस.पी.कापडे, तर आभार प्रा.एस.आर.गायकवाड यांनी मानले. उपप्राचार्य प्रा.अर्जुन पाटील, प्रा.संजय पाटील, प्रा.मनोज पाटील उपस्थित होते.

# यावलला झाला मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## कविसंमेलन, कथाकथनाचे ऑनलाइन आयोजन

प्रतिनिधी । यावल

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. यात व्याख्यान, कवी संमेलन व कविता वाचन, कथाकथन, काव्य स्पर्धा व लेखकाचे अनुभव कथन या कार्यक्रमांचे आभासी मंचद्वारे आयोजन झाले.

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज मर्यादित जळगाव संचलित यावल महाविद्यालयात मराठी विभागातर्फे १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन झाले. १८ जानेवारीला मराठी भाषा : काल, आज आणि उद्या या विषयावर मू. जे. महाविद्यालय, जळगावचे प्रा.डॉ. योगेश महाले यांनी मार्गदर्शन केले. २१ रोजी विद्यार्थ्यांचे कवी संमेलन व कविता वाचन झाले. २३ रोजी काव्य स्पर्धा घेण्यात आली. त्यात अनुक्रमे चारुलता पाटील (एफवायबीएससी) प्रथम, शाहरुख तडवी (एफवायबीए) द्वितीय, व समाधान धिवर (टीवायबीए) तृतीय यांनी यश मिळवले. २५ रोजी कथाकथनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यात डॉ. सुधा खराटे यांनी स्वलिखित \'आधाराचा हात' व \'बोबड्या मुली' या कथा प्रभावी शैलीने सादर केल्या. तसेच महेश अहिरे याने \'चादर' कथेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. एम. डी.खैरनार यांनी खान्देशातील समृद्ध साहित्य व साहित्यिकांचा आढावा घेतला. आभार कोमल बोरनारे हिने मानले. प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य प्रा.ए. पी. पाटील, प्रा.संजय पाटील, डॉ. हेमंत भंगाळे यांनी सहकार्य केले.

### लेखनासाठी साधना हवी

२७ रोजी 'माझा लेखन प्रवास' या विषयावर शिरपूर येथील श्रीमती एच. आर. पटेल महिला महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा नवलेखक डॉ. युवराज पवार यांनी लेखन प्रवासातील विविध अनुभव व्यक्त केले. लेखनासाठी साधना आवश्यक असते. तसेच आत्मचिंतन, अनुभव, आत्मभान, चिंतन, वाचन व सूक्ष्म निरीक्षण शक्ती या गोष्टींची उत्तम लेखनासाठी गरज असते, असे त्यांनी सांगितले.